अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५
फोन : ०२०-२९५१६२६४
ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०८/०९/२०२६

## जिल्हा : पुणे

| मागील आठवड्यातील हवामान (०२/०९/२०२६ ते ०८/०९/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०८/०९/२०२६ ते १२/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | दिनांक | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 0.0 | 6.5 | 0.8 | 0.8 | 0.2 | 1.1 | 0.0 | पाऊस (मिमी) | 10.0 | 8.0 | 5.0 | 5.0 | 15.0 |
| 302.0 | 29.0 | 29.6 | 30.0 | 29.4 | 30.0 | 29.9 | कमाल तापमान (अं.सें.) | 35 | 35 | 36 | 36 | 35 |
| 21.1 | 21.1 | 20.8 | 21.0 | 21.5 | 21.4 | 22.0 | किमान तापमान (अं.सें.) | 24 | 24 | 23 | 23 | 24 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 2 | 3 | 3 | 3 | 5 |
| 88 | 95 | 91 | 90 | 88 | 90 | 90 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 73 | 74 | 74 | 74 | 73 |
| 66 | 65 | 60 | 65 | 72 | 65 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 64 | 59 | 52 | 55 | 62 |
| 6.5 | 3.3 | 6.0 | 5.3 | 4.9 | 3.4 | 4.6 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 11 | 11 | 11 | 12 | 12 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 276 | 287 | 297 | 304 | 300 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्याच्या पूर्व भागात दिनांक ०८, ०९, १० व ११ सप्टेंबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी तर दिनांक १२ सप्टेंबर, २०२६ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता असून जिल्ह्याच्या पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक ०८, ०९ व १० सप्टेंबर, २०२६ रोजी बहुतांश ठिकाणी तर दिनांक ११ व १२ सप्टेंबर, २०२६ रोजी बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्याच्या पूर्व आणि पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक १२ सप्टेंबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १३ ते १९ सप्टेंबर, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • सर्व उभ्या पिकांना ढगाळ हवामानामुळे किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास फुले बायोमिक्स ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास पेरणीनंतर पीक फुलोरा अवस्थेत फुले ग्रेड II ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• पिकांमध्ये पावसाच्या खंडांमुळे ओलाव्याचा ताण जाणवत असेल आणि पाणी उपलब्ध असेल तर संरक्षित पाणी द्यावे. |
| खरीप भात | अधिक फुटव्याची अवस्था | भात खाचरातील पाण्याची पातळी अधिक फुटव्याच्या अवस्थेत ३ ते ५ सें.मी. ठेवावी.<br>भात पिकावरील करपा आणि पर्ण करपा रोगांच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के इ.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. भात पिकावरील खोड किडीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा जपोनिकम या प्रजातीच्या ट्रायको कार्ड ५ ते ६ प्रति हेक्टरी ३ ते ४ वेळा वापरण्यात यावे. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे.<br>ऊस पिकावरील पायरीला किडीचे नियमित निरीक्षण करावे. सरासरी ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ कीड प्रति पान अथवा एका पानावर एक अंडीपुंज आढळल्यास आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्याचे मानून त्वरित नियंत्रणाच्या उपाययोजना सुरू कराव्यात. आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतरच क्लोरपायरीफॉस २० टक्के ई.सी. ३० मि.ली. किंवा अॅसिफेट ५० टक्के + इमिडाक्लोप्रिड १.८० टक्के एस.पी. ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीपूर्वी संबंधित कीटकनाशकाचे सध्याचे CIBRC लेबल-क्लेम, पीक व किडीसाठी मंजुरी तसेच लेबलवरील सूचना तपासूनच वापर करावा. |
| सोयाबीन | फुलोरा अवस्था | ढगाळ हवामानामुळे रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फ्लोनिकामिड ५०% डब्लू. जी. ४ ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. पिकातील मोठे तण काढून ध्यावे |

| | | |
|---|---|---|
| | | त्यामुळे किड व रोगाचे प्रमाण आटोक्यात ठेवण्यास मदत होईल. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी फ्ल्यूबेंडीअमाईड ३९.३५ % एस.सी., ३ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| मुग/उडीद | पक्वता ते काढणी अवस्था | मुगाच्या शेंगा पक्व झाले असल्यास त्याची पहिली तोडणी करून घ्यावे. उडदाच्या शेंगा पक्व झाल्या असल्यास त्याची तोडणी करून घ्यावी. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाचे संरक्षित ठिकाणी वाळवून साठवणूक करवी. |
| मका | पीक वाढीची अवस्था | किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी स्पिनेटोरम ११.७ टक्के एससी ५ मिली किंवा ब्रोफ्लानिलाइड २० टक्के एससी २.५ मिली किंवा आयसोयायक्लोसेरॅम १८.१ एससी ६ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट १.५ टक्के + प्रोफेनोफोस ३५ टक्के डब्लुडीजी १५ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भेंडी | पीक वाढीची अवस्था | भेंडी पिकावरील रसशोषक किडी (मावा, तुडतुडे आणि फुलकिडे) यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड ७०% डब्ल्यु. जी. १ ग्रॅम किंवा थायोमेथोक्झाम २५ डब्ल्यु. जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या (तुडतुडे) किडीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५% ई.सी.४ मिली किंवा फ्लोनीकॅमिड ५० टक्के डब्लु. जी. ४ ग्रॅम किंवा अॅफिडोपायरोपेन ५० डी.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| कांदा | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल., ३ मिली प्रति १० लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी<br>*रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत.<br>* पहिली फवारणी २५ ग्रॅम मॅन्कोझेब ७५% डब्ल्यू.पी. किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० टक्के डब्लु. पी. दुसरी फवारणी प्रोपिकोनॅझोल ५ मिली + मिनरल ओईल १०० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>* कुकुंबर मोझेंक (इंन्फेक्शीअश) विषाणू रोगाच्या नियंत्रणासाठी प्रार्दुभाव दिसताच रोगग्रस्त झाड उपटून दूर ठिकाणी नेऊन जाळून किंवा जमिनीत गाडून नष्ट करावीत. या रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होत असल्याने नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>* कंद सड जीवाणूजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी ब्लिचिंग पावडर ४ ग्रॅम प्रती १/२ लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रती झाड आळवणी करावी.<br>लागवडीनंतर २ महिन्यानंतर जस्त या सूक्ष्म अन्नद्रव्याची ५० ग्रम प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| बटाटा | पीक वाढीची अवस्था | मावा,पांढरीमाशी आणि तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी एकरी १५ पिवळे चिकट सापळे लावावेत.<br>मावा,पांढरीमाशी आणि तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसताच फ्लोनिकामीड ५० डब्लू जी हे कीटकनाशक ०.४ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारावे. कोळी या किडीचा प्रादुर्भाव दिसताच डायफेंथिउरॉन ४७.८० एस सी हे कीटकनाशक १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारावे तसेच लवकर येणारा करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसताच मॅंकोझेब ७५ डब्लू पी ३ ग्रॅम किंवा हेक्साकोनॅझोल २ एस सी २ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारावे. |
| अंजीर | पीक वाढीची अवस्था | खट्टा बहार : अंजीराला कोवळी पाने फुटल्यानंतर साधारणत: छाटणीनंतर २० दिवसापासून १५ दिवसाच्या अंतराने २० ग्रॅम क्लोरोथॅलोनील अधिक १० ग्रॅम कार्बेनडॅझीम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे किंवा १० ग्रॅम कार्बेनडॅझीम अधिक २५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा १० ग्रॅम कार्बेनडॅझीम अधिक २० ग्रॅम कॅप्टन वरील पैकी कोणतीही एक फवारणी आलटून पालटून करावी. अंजीर काढणीच्या एक महिना अगोदर फवारणी बंद करावी . पावसाचा खंड पडल्यास बागेस संरक्षित पाणी द्यावे . अंजीर पिकातील खोड कीडग्रस्त फांदया , खोडे वेळोवेळी काढून नष्ट कराव्यात प्रतिबांधात्मक उपाय म्हणून खोड आणि फांदयांना मुलामा (पेस्ट) द्यावा. त्याकरीता पेस्ट तयार करण्यासाठी १० लि. पाण्यात ४ कि. गेरू रात्रभर भिजत घालून दुस-या दिवशी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५० मिली अधिक कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम एकत्रित चांगले मिसळून तयार झालेल्या पेस्टचा मुलामा खोडावर लावावा. (अंजीर पिकात कोणतेही किटकनाषक लेबल क्लेम नाही).<br>बाष्पीभवनाचा वेग मंदावण्यासाठी आणि झाडाचे तापमान कमी ठेवण्यासाठी केओलिन (पांढरी माती) ४० ते ५० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून झाडावर फवारणी करावी , ज्यामुळे पानांवर पांढरा संरक्षक थर तयार होतोकिंवा पानांमधील पाण्याचा समतोल टिकवण्यासाठी पोटॅशियम नायट्रेट ( 13:0:45) १० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| सिताफळ | पीक वाढीची अवस्था | सिताफळातील पिठ्या ढेकूण या किडीच्या नियंत्रणासाठी लेकेनोसिलियम लेकॅनी (व्हर्टीसिलियम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिशऑईल रोझीन सोप ५ ग्रॅम किंवा मेटारायझीयम ५ ग्रॅम आणि ५ मिली दुध प्रति लिटर पाणी याप्रमाणात आर्द्रतायुक्त हवामान असताना फवारणी करावी. सिताफळ पिकातील फळमाशी व्यवस्थापनासाठी कामगंध सापळे प्रति एकरी ४ ते ५ या प्रमाणात वापरावेत. पावसाचा खंड पडल्यास बागेस संरक्षित पाणी द्यावे.<br>फळे कडक होणे ( Stone fruit): पाण्याच्या ताणामुळे फळे काळी पडून कडक होतात ; त्यासाठी गरजेनुसार संरक्षित पाणी द्यावे.<br>हलकी विरळणी: अतिरिक्त फळांचा भार कमी करून झाडावरील ताण कमी करावा. |
| आंबा | पीक वाढीची | सध्याच्या कोरड्या हवामानामुळे पिकांची घ्यावयाची काळजी : |

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | झाडाच्या मुळाशी आच्छादन (Mulching) करून जमिनीतील ओलावा टिकवावा.<br>उपलब्धतेनुसार ठिबक सिंचनाने नियमित व हलके पाणी द्यावे; पाण्याचा अपव्यय टाळावा.<br>झाडाभोवतीची तणनियंत्रण करून पाण्याची स्पर्धा कमी करावी.<br>मातीतील ओलावा टिकवण्यासाठी सेंद्रिय पदार्थ/कंपोस्ट वापरावा.<br>नव्याने लागवड केलेल्या किंवा लहान झाडांना विशेषतः पाण्याचा ताण येऊ देऊ नये. |
| पेरू | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या कोरड्या हवामानामुळे पिकांची घ्यावयाची काळजी :<br>ठिबक सिंचनाद्वारे गरजेनुसार नियमित पाणी द्यावे.<br>झाडाच्या बुंध्याभोवती सेंद्रिय आच्छादन करावे.<br>तण काढून जमिनीतील उपलब्ध ओलावा पिकासाठी राखावा.<br>फळधारणेच्या अवस्थेत पाण्याची कमतरता होऊ देऊ नये; अन्यथा फळगळ, फळांचा आकार कमी होणे व गुणवत्ता घटणे होऊ शकते.<br>कोरड्या व उष्ण परिस्थितीत लहान झाडांना सावली/संरक्षण द्यावे. |
| डाळिंब | पीक वाढीची अवस्था | फळे फुटणे रोखणे: पावसाचा खंड पडल्यास बोरॉन १ ग्रम + कॅल्शियम नायट्रेट १ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>मृगबहाराची फळे वाढीच्या अवस्थेत असल्यामुळे संरक्षित पाणी देणे गरजेचे आहे परंतु पाण्याची टंचाई असल्यास चाळीस ते साठ टक्के पर्यंत ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्यात यावे. |
| बोर | पीक वाढीची अवस्था | ढगाळ वातावरणामुळे भुरी रोगा च्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>कळी व फळधारणा: फळांचा आकार राखण्यासाठी लहान किंवा किडलेली फळे काढून टाकावीत.<br>जमिनीत ओल टिकून राहण्यासाठी संरक्षित पाणी द्यावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावर विल्यानंतर पहिले चार दिवस जवळपास २ किलो गव्हांडा , दिड किलो गूळ, २ चमचे मीठ व क्षारयुक्त मिश्रण द्यावे. पहिले तीन महिने दिवसातील संपूर्ण २८ ते ३० किलो आहार तीन वेळा विभागून दिल्यास दूध उत्पाद न चांगल्या प्रकारे मिळते. रोजच्या शरीर पोषणासाठी जवळजवळ एक ते दिड किलो देशी गायींसाठी , तर २ किलो खुराक संकरित गाय किंवा म्हशीसाठी द्यायला हवा. दुधाळ जनावराला वजनाच्या २ ते ३.५ टक्के सुका चारा द्यावा. प्रती तीन लिटर दुधामागे प्रत्येक दिवशी एक ते दीड किलो जास्तीचा खुराक द्यावा. दुधाळ गायी व म्हशीला दररोज १५ ते २० किलो हिरवा चारा बारीक तुकडे करुन , तसेच ४ ते ८ किलो सुका चारा दिल्यास दुग्ध उत्पादनात फायदा मिळू शकतो.<br>आहारामध्ये जास्त प्रथिने, खनिज मिश्रण असलेले खाद्य द्यावे. खनिजांचा पुरवठा होण्यासाठी शेवग्याच्या झाडाचा पाला दिल्यास फायदा होतो दररोज २० ग्रॅम खनिज मिश्रण खाद्यातून दिल्यास दुध उत्पादन वाढते. याशिवाय मुबलक प्रमाणात स्वच्छ पाणी पाजावे. दूध एकाच माणसाच्या हाताने ठरावीक वेळेतच व समान अंतराने काढावे. शेवटची धार पूर्णपणे काढावी. त्यात स्निग्धांशांचे प्रमाण वाढते. जनावरे आणि गोठा स्वच्छ ठेवावा अशा प्रकारे काळजी घेतल्यास दुध उत्पादन वाढण्यास मदत होते. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत उत्पादित होणाऱ्या जिवाणू खतांची माहिती तसेच उपलब्धता ठिकाण कृषि अणुजीवशास्त्रज्ञ, कृषि महाविद्यालय, पुणे-४११००५ फोन नं.: (०२०) २५५३७०३३ विस्तार २३२ किंवा २२८**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : ०८.०९.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**